महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
महाराष्ट्र राज्यमाध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४
दूरध्वनी क्र. :-०२०- 29709617 वेबसाइड :-mscepune.in ई-मेल :- www.mscegcctbc@gmail.com

**परीक्षा प्राधान्य/ महत्वाचे**

जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/पुर्नचाचणी/२०२६/ 4767
दिनांक :- १४ / १०/ २०२६.

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,
जिल्हा परिषद,परभणी,भंडारा,गोंदिया,चंद्रपूर व नांदेड.

**विषय** :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै-२०२६ मधील निकाल राखीव ठेवलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशवाटपाबाबत.
**संदर्भ** :- या कार्यालयाचे जा.क्र.४७३१,दि.१३/१०/२०२६ रोजीचे प्रसिध्दीपत्र.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे मार्फत शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै-२०२६ मध्ये निकाल राखीव ठेवलेल्या ११ केंद्रावरील उमेदवारांची टंकलेखन कौशल्य चाचणी दि.१६/१०/२०२६ ते दि.१९/१०/२०२६ (दि.२१/१०/२०२६ ते दि.२३/१०/२०२६ राखीव दिवस) आयोजित करण्यात आलेली आहे.

संदर्भिय पत्रानुसार सदर परीक्षेसाठी प्रविष्ठ उमेदवारांची प्रवेशपत्र संबंधित संस्थांना संस्थालॉगिंनमध्ये दि.१३/१०/२०२६ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

तथापि, संबंधित संस्थाचालक प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र वितरित करित नसलेबाबत निदर्शनास आलेले आहे. तरी आपल्या कार्यालयामार्फत संबंधित संस्थांना सदर विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र वितरित करणेबाबत आदेशित करावे.

तसेच सदरील प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षेसंबंधिची माहिती आपणांस https://mscepune.in/gcc/OCT२०२६/HALL/bATCH/११/all/GCCBATCHstop.aspx या लिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदरील माहिती संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यासाठी आपल्या मार्फत स्थानिक वृत्तपत्रात मोठया प्रमाणात प्रसिध्दी दयावी. संबंधित विद्यार्थ्यांना आपल्या कार्यालयामार्फत वितरित करण्यात येत असलेल्या प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांचा फोटो चिकटवून त्यावर उपशिक्षणाधिकारी यांच्या सही व शिक्क्यानिशी वितरित करावीत.

14/10/26

**(नंदकुमार बेडसे- भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -०४.**

प्रत माहिती व तातडीने कार्यवाहीस्तव :
विभागीय शिक्षण उपसंचालक , छत्रपती संभाजीनगर, लातूर व नागपूर विभाग.